

1) **नामदेव धोंडो महानोर**

**नामदेव धोंडो महानोर** (सप्टेंबर १६, इ.स. १९४२; पळसखेड, ब्रिटिश भारत - हयात) हे मराठी कवी, गीतकार, शेतकरी व माजी आमदार आहेत. मराठी साहित्य परिषदेच्या वतीने पुण्यात झालेल्या पहिल्या पर्यावरणप्रेमी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. इतकेच नाही तर २४ मार्च २०१४ रोजी सुरू झालेल्या दशदिवसीय ई-साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

## अनुक्रमणिका


- १ जीवन
- २ प्रकाशित साहित्य
- ३ चित्रपट गीते
- ४ राजकीय कारकीर्द
- ५ पुरस्कार
- ६ बाह्य दुवे


## जीवन

महानोरांचा जन्म सप्टेंबर १६, इ.स. १९४२ रोजी महाराष्ट्रातल्या वर्तमान औरंगाबाद जिल्ह्यातील *पळसखेड* या गावी झाला. त्यांचे शालेय शिक्षण पळसखेड, पिंपळगाव, शेंदुर्णी येथे झाले. त्यानंतर जळगावातील महाविद्यालयात त्यांनी प्रवेश घेतला; मात्र त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण पहिल्या वर्षापर्यंतच झाले[*संदर्भ हवा*]. महाविद्यालयीन शिक्षण सोडून शेती करायला ते आपल्या गावी परतले[*संदर्भ हवा*].मराठी साहित्यविश्वात ते 'रानकवी' म्हणून प्रसिद्ध आहेत.

## प्रकाशित साहित्य

| नाव | साहित्यप्रकार | प्रकाशन | प्रकाशन वर्ष (इ.स.) |
|---|---|---|---|
| अजिंठा (कवितासंग्रह) | दीर्घ कविता | पॉप्युलर प्रकाशन | १९८४ |
| गंगा वाहू दे निर्मळ | कविता संग्रह | पॉप्युलर प्रकाशन | |
| जगाला प्रेम अर्पावे | कविता संग्रह | पॉप्युलर प्रकाशन | |
| त्या आठवणींचा झोका | | साकेत प्रकाशन | |
| दिवेलागणीची वेळ | कविता संग्रह | साकेत प्रकाशन | |
| पळसखेडची गाणी | लोकगीते | पॉप्युलर प्रकाशन | |
| पक्षांचे लक्ष थवे | | पॉप्युलर प्रकाशन | |
| पानझड | | पॉप्युलर प्रकाशन | |

| नाव | साहित्यप्रकार | प्रकाशन | प्रकाशन वर्ष (इ.स.) |
|---|---|---|---|
| पावसाळी कविता | कविता संग्रह | पॉप्युलर प्रकाशन | |
| यशवंतराव चव्हाण | | साकेत प्रकाशन | |
| रानातल्या कविता | कविता संग्रह | पॉप्युलर प्रकाशन | |
| शरद पवार आणि मी | | साकेत प्रकाशन | |
| शेती, आत्मनाश व संजीवन | | साकेत प्रकाशन | |

# चित्रपट गीते

| चित्रपट | वर्ष (इ.स.) |
|---|---|
| जैत रे जैत | इ.स.१९७७ |
| सर्जा | इ.स.१९८७ |
| एक होता विदूषक | इ.स.१९९२ |
| मुक्ता | इ.स.१९९४ |
| दोघी | इ.स.१९९५ |

# राजकीय कारकीर्द


महाराष्ट्र विधान परिषदेवर नियुक्त सभासद म्हणून महाराष्ट्र शासनाने महानोरांची शिफारस केल्यावर इ.स. १९७८ साली ते महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य झाले.

# पुरस्कार

- भारत सरकारचा 'पद्मश्री' पुरस्कार, इ.स.१९९१
- कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा जनस्थान पुरस्कार, इ.स. २००९
- साहित्य अकादमी पुरस्कार, इ.स. २००० - 'पानझड'
- महानोर आणि त्यांच्या पत्नी सुलोचना यांना यशवंत-वेणू पुरस्कार (२०१७)

# बाह्य दुवे

- "अधिकृत संकेतस्थळ" (मराठी मजकूर).
- "मराठी ई-साहित्य संमेलन" (मराठी मजकूर). मराठीमाती.



2) **फ.मुं. शिंदे** (फकीरराव मुंजाजी शिंदे.

जन्म: १९४८ - हयात) हे मराठी कवी, लेखक आहेत.

## अनुक्रमणिका


- १ जीवन
- २ प्रकाशित साहित्य
- ३ पुरस्कार आणि सन्मान
  - ३१. साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद
- ४ संदर्भ आणि नोंदी


## जीवन

महाराष्ट्राच्या हिंगोली जिल्ह्यातील 'रुपूर' गावी १९४८ साली शिद्यांचा जन्म झाला. पेशाने ते मराठीचे प्राध्यापक आहेत.

## प्रकाशित साहित्य

- अवशेष (१९७९)
- आई आणि इतर कविता
- आदिम (१९७५)
- आयुष्य वेचताना
- कबंध
- कालमान काव)्यसमीक्षा(
- गणगौळण
- गाथा
- गौरवग्रंथ
- जुलूस
- दिल्ली ते दिल्ली

- फकिराचे अभंग
- निरंतर
- निर्मिकाचं निरूपण
- निर्वासित नक्षत्र
- पाठभेद
- प्रार्थना
- फकिराचे अभंग
- मिथक
- मी सामील समूहात
- मेणा
- लाकडाची फुले
- लोकगाणी
- वृंदगान
- सार्वमत
- सूर्यमुद्रा
- स्वान्त (१९७३)
- क्षेत्र

## पुरस्कार आणि सन्मान

- स्वातंत्र्यसैनिक भाई फुटाणे प्रतिष्ठान चा संत(जामखेड) २०१० नामदेव पुरस्कार
- कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार (२०११)
- पुणे मराठी ग्रंथालयाच्या वतीने देण्यात येणारा साहित्यसम्राट न केळकर .चिं . (२०१३) पुरस्कार
- मराठी रंगभूमी परिनिरिक्षण मंडळाचे अध्यक्षपद
- काकासाहेब गाडगीळ प्रतिष्ठानचा काकासाहेब गाडगीळ साहित्य पुरस्कार (२०१३)
- पुणे मसापचा कवी यशवंत पुरस्कार.
- पुणे मसापचा कवी भा .रा. .तांबे पुरस्कार
- सोलापूरचा दमाणी साहित्य पुरस्कार.
- राष्ट्रीय बहुजन विकास महासंघाचा साहित्यरत्न अण्णा

भाऊ साठे पुरस्कार.[१]
- नांदेडचा प्रसाद बन साहित्य पुरस्कार.
- जालन्याचा हरिश्चंद्रराय दुख:ी पुरस्कार.
- लोणी चा पद्मश्री(प्रवरानगर) .विखे पाटील साहित्य पुरस्कार
- कळमनुरीचा स्वातंत्र्यसैनिक कोंडबाराव जरोडेकर पुरस्कार.
- सेलूचा स्वातंत्र्यसैनिक विनायकराव चारठाणकर साहित्य गौरव पुरस्कार.

## साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद

- मराठवाडा मराठी साहित्य संमेलन, २००९
- पहिले गुणीजन साहित्य संमेलन २००५, औरंगाबाद.
- ८७वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सासवड इ.स. २०१४
- महाराष्ट्र राज्य कामगार साहित्य संमेलन, नांदेड
- अस्मितादर्श साहित्य संमेलन, अमरावती
- परभणी जिल्हा साहित्य संमेलन, सोनपेठ
- दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलन, कुंभारगाव
- नरहर कुरुंदकर स्मृती साहित्य संमेलन, नांदेड
- आंबेडकरी साहित्य संमेलन, पुलगाव
- परिवर्तन साहित्य संमेलन, अहमदपूर
- मराठी साहित्य संमेलन, निपाणी (बेळगाव)
- शेकोटी साहित्य संमेलन, पणजी
- अत्रे साहित्य संमेलन, सासवड
- महाराष्ट्र युवक साहित्य संमेलन, नाशिक
- ग्रामीण मराठी साहित्य

संमेलन, विटा

- साहित्यिक कलावंत संमेलन, पुणे
- वारणेचा वाघ साहित्य संमेलन, कोडोली
- राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलन, तुळजापूर
- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार साहित्य संमेलन, राळेगाव
- शब्दगंध साहित्य संमेलन, अहमदनगर
- सीमावर्ती मराठी साहित्य संमेलन, कोवाड


# संदर्भ आणि नोंदी


1. शिंदे .मु .फ", प्रशांत मोरे यांना अण्णा भाऊ साठे गौरव पुरस्कार .(मराठी मजकूर) " .२०१३ ऑगस्ट ११ .सकाळ२ ऑगस्ट २०१४ रोजी पाहिले.


## मराठी कवी

- मराठी लेखक
- इ मधील १९४८ .स.जन्म
- अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांचे अध्यक्ष

======================




**3) भास्कर तात्याबा चंदनशिव** (जन्म :१२ जानेवारी १९४५, हासेगांव-कळंब) हे प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक आहेत. मुळचे **भास्कर देवराव यादव** हे दत्तकविधानानंतर *भास्कर तात्याबा चंदनशिव* झाले. निजाम राजवटीतील मराठवाड्यात असलेल्या उस्मानाबाद जिल्हयातील कळंब गावापासून बार्शीकडे कडे जाणाऱ्या महामार्गावरील हासेगाव हे त्यांचे मूळ जन्म गाव होय. [१]

## अनुक्रमणिका


- १ शिक्षण
- २ साहित्यिक
- ३ पुस्तके
- ४ कथासंग्रह
- ५ अन्य संपादित साहित्य
- ६ सन्मान आणि पुरस्कार
- ७ संदर्भ


## शिक्षण

प्राथमिक शिक्षण खेडेगावात झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी अंबाजोगाई आणि

औरंगाबाद असा प्रवास त्यांनी केला. वयाच्या विसाव्या वर्षी भास्कर चंदनशिव यांनी कथालेखनास प्रारंभ केला. तत्पूर्वी मराठवाडयाच्या काळजावर सातत्याने कोरला गेलेला दुष्काळ हा त्यांच्या अनुभवाचा आणि अभ्यासाचा विषय राहिला.

इ.स. १९६२ ते ७२ या कालावधीत दुष्काळाचा अभ्यास आणि अनुभव यांवर लक्ष केंद्रित करून त्यांनी काम केले.[२]

## साहित्यिक

त्यांच्या साहित्यकृतीमध्ये सातत्याने ग्रामीण भागातील शेतकरी, सामान्य नागरिक नायकाच्या रूपाने वाचकांच्या समोर येतो. ज्यांची नाळ मातीशी जोडली गेलेली आहे आणि मूळ गावगाडयात घट्ट रुतलेले आहे. चंदनशिव यांच्या ‘जांभळढव्ह’, ‘मरणकळा’, ‘अंगारमाती’, ‘बिरडं’, ‘नवी वारुळं’ या कथासंग्रहांचा आवर्जून उल्लेख केला जातो. मानवी समाजजीवनाला व्यापकपणे स्पर्श करणाऱ्या या कथासंग्रहांनी शेती क्षेत्रात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे उगवून वर आलेले वेदनेचे कोंब दाखवून देण्याचे काम केले.

## पुस्तके

## कथासंग्रह

- अंगारमाती
- जांभळढव्ह
- नवी वारुळं
- बिरडं
- भिंगुळवाणा
- मरणकळा

### अन्य संपादित साहित्य

- लाल चिखल - निवडक भास्कर चंदनशिव - संपादक इंद्रजीत भालेराव

### सन्मान आणि पुरस्कार

- डाॅ. भास्कर चंदनशिव हे मराठवाडा साहित्य परिषदेच्या २०११ सालच्या एप्रिलमध्ये केज (जिल्हा बीड) येथे झालेल्या १ल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष होते.
- तसेच ते २-२-२०१२ रोजी पळसप(जिल्हा औरंगाबाद) येथे झालेल्या एकदिवसीय मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाचेही अध्यक्ष होते.

### संदर्भ


- भालेराव, इंद्रजीत. *निवडक लाल चिखल* (मराठी मजकूर). लोक वांङ्गृह. आय.एस.बी.एन. 9789380456042

Check |isbn= value
(सहाय्य). १५ नोव्हेंबर २०१७
रोजी पाहिले.

- "ग्रामीण जीवनाचा
‘बखर’कार!" (मराठी मजकूर).



## 4) श्रीकांत देशमुख

हे एक मराठी साहित्यिक आहेत. ते मूळचे बुलढाणा जिल्ह्यातील राहेरी बुद्रुकचे असून नांदेडला स्थायिक झाले आहेत. ते सनदी अधिकारी आहेत.

# श्रीकांत देशमुख यांनी लिहिलेली पुस्तके

- कुळवाडीभूषण शिवराय (ऐतिहासिक)
- पडझड वाऱ्याच्या भिंती (कथासंग्रह)
- बोलावें ते आम्ही (साहित्य अकादमी पुरस्कृत कवितासंग्रह)
- भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य : नव्या पिढीचे अर्धशतकोत्तर पुरावलोकन (संपादित)
- महानोरांची कविता (संपादित कविता आणि लेख)
- समकालीन साहित्यचर्चा (डॉ. नागनाथ कोतापल्ले गौरवग्रंथ) - (समीक्षा, सहसंपादक - मनोहर जाधव)

# पुरस्कार

- 'बोलावें ते आम्ही' या काव्यसंग्रहाला २०१७ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार

========================================================================



# 5) दासू वैद्य

मराठीतले आघाडीचे कवि आणि साहित्यकार. त्यांनी कवितांप्रमाणेच नभोनाट्य, एकांकिका, बालसाहित्य आणि चित्रपट गीतलेखन या प्रांतातही विपुल लेखन केले आहे. एकांकिकांचे दिग्दर्शनही त्यांनी केले आहे. 'दासू' ची कविता आजूबाजूच्या जीवनात अधिक रमते. विसंगती आणि विरोध ही त्यांच्या कवितेची शक्तिस्थाने आहेत

## अनुक्रमणिका


- १ जन्म आणि जीवन
- २ साहित्यिक कारकीर्द
- ३ प्रकाशित पुस्तके
- ४ संदर्भ
- ५ बाह्य दुवे


### जन्म आणि जीवन

दासू वैद्य यांचे बालपण नांदेड जिल्ह्यातल्या मुदखेड येथे गेले.. शाळेत असताना ग्रामीण जीवन जवळून अनुभवता आले. गणितासारख्या विषयाशी त्याकाळात कधी जमले नाही तरी लहानपणापासून सगळ्या कविता तोंडपाठ असायच्या. "आई-वडील, भावाने तुला जे काय करायचे आहे ते कर अशी मुभा दिली, त्यामुळे चौकटीत राहून स्वैराचारासारखे मिळवत गेलो," असेही दासू यांनी स्वतः बाबत सांगितले आहे[१]. पुढे पदव्यूत्तर शिक्षण त्यांनी औरंगाबादच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून पूर्ण केले. ते या विद्यापीठात मराठी विभागात अध्यापन करतात.

### साहित्यिक कारकीर्द

दासू वैद्य १९८७ पासून विविध वाङ्मयीन नियतकालिकांत नियमित लेखन करीत आहेत. महाराष्ट्रातल्या अनेक मान्यवर एकांकिका स्पर्धातून त्यांनी लिहीलेल्या आणि दिसाहित्य अकादमीची तरूण लेखकांसाठी असलेली सन्मानवृत्ती त्यांना मिळाली आहे. अकादमीच्या राष्ट्रीय महोत्सवात त्यांनी कवितांचे वाचन केले आहे. त्यांच्या काही कवितांचे हिंदी इंग्रजी मल्याळम तेलुगू आणि उर्दू भाषांत भाषांतर झाले आहे.अल्फागौरव, मटा सन्मान आणि महाराष्ट्र शासनाचे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. ज्येष्ठ साहित्यिक विजय तेंडुलकर यांनी त्यांच्या बालकवितांचे वाचन केले आहे[2]. दूरचित्रवाणी मालिका आणि सावरखेड एक गाव सारख्या काही चित्रपटांसाठीही त्यांनी गीतलेखन केले आहे.त्यांची तीन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

### प्रकाशित पुस्तके

दासू वैद्य यांची पुढील पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत [३]

१) *तूर्तास* (कवितासंग्रह) जानेवारी २००३ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

२) *क कवितेचा* (बालकवितासंग्रह) जुलै २००९ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

३) *भुर्र* (बालकुमार वाङ्मय) साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

४) "आजूबाजूला" (ललित लेखसंग्रह) जानेवारी २०१०, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.

५) "तत्पूर्वी" (कवितासंग्रह) फेब्रुवारी २०१४, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

### संदर्भ


१. गावातल्या संस्कारांनी दिले जगाचे ज्ञान - प्रा. दासू वैद्य [*मृत दुवा*]

२. दासू वैद्य [*मृत दुवा*]

३. प्रकाशित पुस्तकांची यादी


## बाह्य दुवे

- "आठवणीतली गाणी". January 23, 2012 रोजी पाहिले.

### [मराठी कवी

वर्ग:

- विस्तार विनंती
- मराठी साहित्यिक
- मराठी कवी
- इ.स. १९६७ मधील जन्म

==============================================================

## 6) डॉ. पी. विठ्ठल

( जन्म- ०१ जून १९७५)(शिक्षण: एम.ए. नेट , पीएच.डी.) हे नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या भाषा संकुलात २९ जानेवारी २००९ पासून मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यापूर्वी ते औरंगाबाद येथील म. शि. प्र. मंडळाच्या देवगिरी महाविद्यालयात १६ डिसेंबर २००४ ते २८ जानेवारी २००९ पर्यंत पूर्णवेळ व्याख्याता होते. २००१ पासून त्यांनी शिवछत्रपती महाविद्यालयातही अध्यापन केले आहे. Dr. P.Vitthal हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राचे प्रमुख आहेत. मराठी विषयातील पीएच. डी. आणि एम. फिल. साठी संशोधक मार्गदर्शक आहेत.त्यांच्याकडे चार विद्यार्थ्यांनी पीएच.डी केली आहे ,ेतर पाच विद्यार्थ्यांनी एम.फिल केली आहे. नव्वदोत्तर पिढीतील एक महत्वाचे कवी म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना बडोदा येथील अभिरुची गौरव पुरस्कार,अहमदनगर येथील संजीवनी खोजे काव्य पुरस्कार, नांदेड येथील प्रसाद बन ग्रंथ गौरव पुरस्कार, अमरावती येथील स्व.सुर्यकांतादेवी पोटे पुरस्कारासह अनेक महत्त्वाचे सन्मान मिळाले आहेत.

## प्रकाशित पुस्तके


'शून्य एक मी ' (कॉन्टीनेन्ट्ल प्रकाशन , पुणे,२०१७) 'माझ्या वर्तमानाची नोंद ' (गोदा प्रकाशन , औरंगाबाद,२०११) हे कवितासंग्रह, 'करुणेचा अंत:स्वर' (कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१६), 'संदर्भ: मराठी भाषा' (२०१४ मीरा बुक्स, औरंगाबाद ) हे लेखसंग्रह आणि 'वाङ:मयीन प्रवृत्ती : तत्वशोध' (प्रतिमा प्रकाशन, पुणे २००७), 'विशाखा : एक परिशीलन' (चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००७), 'सर्वदर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर' (डायमंड प्रकाशन, पुणे २०१६ ) 'जनवादी साहित्यिक: अण्णा भाऊ साठे' (डायमंड प्रकाशन, पुणे २०१७ ) इत्यादी संपादने आणि ' जागतिकीकरण, बदलते सामाजिक वास्तव आणि समकालीन मराठी कविता' ही पुस्तिका (अक्षरवाड्मय प्रकाशन, पुणे,२०१७ ) तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या मराठी विषयाच्या काही पुस्तकांचे त्यांनी लेखन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , औरंगाबादच्या बी.ए. द्वितीय वर्षाच्या पाठ्यपुस्तकात त्यांच्या कवितेचा समावेश होता. काही काळ त्यांनी विश्वकोशाचे (कुमार चरित्र -अपूर्ण राहिले) अभ्यागत संपादक म्हणूनही काम केले आहे.

## इतर

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या 'आशय' या मुखपत्राचे ते पहिले संपादक आहेत. याशिवाय 'भाषाभान' या त्रैमासिक काही काळ त्यांनी संपादन केले आहे. पी विठ्ठल हे मराठी भाषा अध्यापक परिषदेचे सहसचिव असून मराठीतील बहुतेक सर्वच महत्वाच्या वाड्मयीन नियतकालिकांमधून व वर्तमानपत्रातून (उदा. मौज, महाराष्ट्र टाइम्स, खेळ, प्रतिष्ठान, अस्मितादर्श,

कविता-रती, सांकृतिक कालनिर्णय, युगवाणी, दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका , पंचधारा, साक्षात, आशय, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, काव्याग्रह, उर्मी, लोकसत्ता, परिवर्तनाचा वाटसरू, सकाळ, लोकमत, पुण्यनगरी,) त्यांचे लेखन प्रकाशित आहे. साहित्य अकादेमीच्या Indian Literature च्या ३०१ व्या अंकात कवितांचा इंग्रजी अनुवाद. याशिवाय काही कवितांचे हिंदी अनुवाद प्रसिद्ध , विविध विद्यापीठातील उजळणी वर्ग आणि विविध चर्चासत्रात त्यांनी व्याख्याने दिली आहेत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात अनेकदा कवी व वक्ता म्हणून निमंत्रित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या www.mahanews.gov.inवेबपोर्टवलर त्यांनी 'आपली मराठी', दैनिक पुण्यनगरीच्या मराठवाडा आवृत्तीत 'करुणेचा अंत:स्वर' आणि दैनिक सकाळ मध्ये 'सम-विषम' या नावाने केलेले सदर लेखन प्रचंड वाचकप्रिय ठरले आहे.



## 7) इंद्रजीत नारायणराव भालेराव

हे एक मराठी कवी असून ग्रामीण कवी म्हणून इंद्रजीत भालेराव ह्यांचे नाव मराठी साहित्याच्या क्षेत्रात प्रसिद्ध आहे.

# कविता संग्रह

1. पीकपाणी (१९८९)
2. आम्ही काबाडाचे धनी (१९९२)
3. दूर राहिला गाव (१९९४)
4. कुणबिणीची कहाणी (१९९६)
5. रानमळ्याची वाट (१९९६)
6. उगवले नारायण (१९९६)
7. गावकडं चल माझ्या दोस्ता (१९९८)
8. पेरा (२००२)
9. टाहो (२००२)
10. भूमीचे मार्दव (२०११)

## 8) सुहासिनी इर्लेकर

डॉ. **सुहासिनी इर्लेकर** (इ.स. १९३२:सोलापूर, महाराष्ट्र - २८ ऑगस्ट, इ.स. २०१०:बीड, महाराष्ट्र) या मराठी कवयित्री आणि लेखिका होत्या. संत साहित्याच्या अभ्यासक असलेल्या इर्लेकर मराठवाडा विद्यापीठाच्या पहिल्या महिला पीएच.डी होत्या.

डॉ. सुहासिनी इर्लेकर या बीड येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या मराठी विभागात विभागप्रमुख होत्या. त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कॉलेजचे वाङ्मय मंडळ विकसित केले होते. इर्लेकरांनी १०हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित केले.

## प्रकाशित साहित्य

- अभंगसागरातील दीपस्तंभ (संतसाहित्याचा तौलनिक अभ्यास)
- अक्षर (कवितासंग्रह)
- आई! ती माझी आई (कथासंग्रह)
- आकाशाच्या अभिप्रायार्त (साहित्य आणि समीक्षा)
- आजी आणि शेनवॉर्न (बालसाहित्य)
- आद्य मराठी आत्मचरित्रकार संत नामदेव
- आल्या जुळून तारा (साहित्य आणि समीक्षा)
- गाणारे देवघर
- गाथा (कवितासंग्रह)
- गुरुशिष्यसंवाद आणि समाधिसंकल्पना (माहितीपर)
- चित्रांगण (कथा, लेख, भाषणे)
- छांदस (कवितासंग्रह)
- जनाबाईचे निवडक अभंग (संतसाहित्यपर)
- नरेंद्रकृत आद्य मराठी महाकाव्य (रसग्रहण)
- नाथांचे रुक्मिणी-स्वयंवर
- नाना फडणविसांचे आत्मचरित्र (ग्रंथपरिचय)
- नामदेवकृत ज्ञानेश्वरचरित्र (ग्रंथपरिचय)
- बुद्ध चरित गाऊ या (कवितासंग्रह)
- भगवान गौतमबुद्ध (मार्गदर्शपर)
- महानंदेचे धवले (कादंबरी)
- मी भारतीय आहे
- मुक्तीकडून मुक्तीकडे (संत मुक्ताबाईंचे व्यक्तिचित्रण)
- यादवकालीन मराठी काव्यसमीक्षा (वैचारिक)
- संत कवि आणि कवयित्री : एक अनुबंध (साहित्य आणि समीक्षा)
- संत साहित्य - एक रूपवेध
- समर्थ रामदासांची करुणाष्टके (ग्रंथपरिचय आणि रसग्रहण)
- साहित्यसंवाद (साहित्य, साहित्य आणि समीक्षा)
- स्फुट आणि अस्फुट

- ह्या मौन जांभळ्या क्षणी (कवितासंग्रह)
- ज्ञानियांचा राजा (संत साहित्याचे सखोल विवेचन)
- ज्ञानेश्वरीचे अंतरंग (ग्रंथपरिचय)

# पुरस्कार/सन्मान

- महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे 'सुहासिनी इर्लेकर पुरस्कार' दिला जातो. आत्तापर्यंत हा पुरस्कार ..., ..., पृथ्वीराज तौर (२०१४) यांना मिळाला आहे.
- बीड नाट्यपरिषदेतर्फे दिला जाणारा (कै.) डॉ. सुहासिनी इर्लेकर पुरस्कार अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी यांना देण्यात आला. (२०१३).
- सुहासिनी इर्लेकर यांना वारकरी साहित्य परिषदेतर्फे मरणोत्तर पुरस्कार देण्यात आला (६-१०-२०१३)
- बीड शहरात २०१३सालच्या फेब्रुवारी महिन्यात झालेल्या लेखिका साहित्य संमेलनात डॉ.सुहासिनी इर्लेकर यांच्या कवितांवरील

'आकाशाच्या अभिप्रायार्थ' हा वाचन, नृत्य, गायन असा काव्य संग्रहणाचा खास कार्यक्रम झाला. तो साहित्यिक डॉ. सतीश साळुंके यांनी दिग्दर्शित केला होता. संमेलनस्थळाला सुहासिनी इर्लेकरांचे नाव देण्यात आले होते.


[दाखवा]

- **ब**
- **च**
- **सं**

### मराठी साहित्यिक

वर्ग:

- मराठी लेखिका
- इ.स. १९३२ मधील जन्म
- इ.स. २०१० मधील मृत्यू



### 9) भास्कर तात्याबा चंदनशिव

(जन्म :१२ जानेवारी १९४५, हासेगांव-कळंब) हे प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक आहेत. मुळचे **भास्कर देवराव यादव** हे दत्तकविधानानंतर *भास्कर तात्याबा चंदनशिव* झाले. निजाम राजवटीतील मराठवाड्यात असलेल्या उस्मानाबाद जिल्हयातील कळंब गावापासून बार्शीकडे कडे जाणाऱ्या महामार्गावरील हासेगाव हे त्यांचे मूळ जन्म गाव होय. [१]

## अनुक्रमणिका


- १ शिक्षण
- २ साहित्यिक
- ३ पुस्तके
- ४ कथासंग्रह
- ५ अन्य संपादित साहित्य
- ६ सन्मान आणि पुरस्कार
- ७ संदर्भ


## शिक्षण

प्राथमिक शिक्षण खेडेगावात झाल्यानंतर महाविद्यालयीन शिक्षणासाठी अंबाजोगाई आणि औरंगाबाद असा प्रवास त्यांनी केला. वयाच्या विसाव्या वर्षी भास्कर चंदनशिव यांनी कथालेखनास प्रारंभ केला. तत्पूर्वी मराठवाडयाच्या काळजावर सातत्याने कोरला गेलेला दुष्काळ हा त्यांच्या अनुभवाचा आणि अभ्यासाचा विषय राहिला.

इ.स. १९६२ ते ७२ या कालावधीत दुष्काळाचा अभ्यास आणि अनुभव यांवर लक्ष केंद्रित करून त्यांनी काम केले.[२]

## साहित्यिक

त्यांच्या साहित्यकृतीमध्ये सातत्याने ग्रामीण भागातील शेतकरी, सामान्य नागरिक नायकाच्या रूपाने वाचकांच्या समोर येतो. ज्यांची नाळ मातीशी जोडली गेलेली आहे आणि मूळ गावगाडयात घट्ट रुतलेले आहे. चंदनशिव यांच्या 'जांभळढव्ह', 'मरणकळा', 'अंगारमाती', 'बिरडं', 'नवी वारुळं' या कथासंग्रहांचा आवर्जून उल्लेख केला जातो. मानवी समाजजीवनाला व्यापकपणे स्पर्श करणाऱ्या या कथासंग्रहांनी शेती क्षेत्रात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे उगवून वर आलेले वेदनेचे कोंब दाखवून देण्याचे काम केले.

## पुस्तके

# कथासंग्रह

- अंगारमाती
- जांभळढव्ह
- नवी वारुळं
- बिरडं
- भिंगुळवाणा
- मरणकळा

# अन्य संपादित साहित्य

- लाल चिखल - निवडक भास्कर चंदनशिव - संपादक इंद्रजीत भालेराव

# सन्मान आणि पुरस्कार

- डाॅ. भास्कर चंदनशिव हे मराठवाडा साहित्य परिषदेच्या २०११ सालच्या एप्रिलमध्ये केज (जिल्हा बीड) येथे झालेल्या १ल्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष होते.
- तसेच ते २-२-२०१२ रोजी पळसप(जिल्हा औरंगाबाद) येथे झालेल्या एकदिवसीय मराठवाडा ग्रामीण साहित्य संमेलनाचेही अध्यक्ष होते.

# संदर्भ


1.

• भालेराव, इंद्रजीत. *निवडक लाल चिखल* (मराठी मजकूर). लोक वांङ्गगृह. आय.एस.बी.एन. 9789380456042 Check |isbn= value (सहाय्य). १५ नोव्हेंबर २०१७ रोजी पाहिले.


2. • "ग्रामीण जीवनाचा 'बखर'कार!" (मराठी मजकूर).


## मराठी साहित्यिक

वर्ग:

- Pages with ISBN errors
- विस्तार विनंती
- इ.स. १९४५ मधील जन्म
- साहित्यिक
- मराठी लेखक

**=================================================================**



## 10) नागनाथ कोत्तापल्ले

(जन्मः २९ मार्च, इ.स. १९४८; मुखेड, नांदेड- हयात) हे मराठी भाषेतील लेखक, कवी, व समीक्षक आहेत व राजभाषा मराठीचे धोरण ठरविण्यासाठी शासनाने स्थापन केलेल्या समितीचे अध्यक्ष आहेत.[१] ते ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत.

# अनुक्रमणिका


- १ जीवन
- २ कारकीर्द
- ३ कोतापल्लेंवरील लेखन साहित्य
- ४ पुस्तके
    - ४.१ कविता संग्रह
    - ४.२ कादंबरी व कथासंग्रह
    - ४.३ समीक्षण, वैचारिक
- ५ पुरस्कार
- ६ संदर्भ


# जीवन

नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्म २९ मार्च, इ.स. १९४८ या दिवशी जिल्हा नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथे झाला.[२] शालेय शिक्षण मुखेडच्या जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये आणि बीए मराठीचे शिक्षण देगलूर महाविद्यालय येथे पूर्ण केले. त्यात ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले..[3] त्यांनी १९८० मध्ये पीएच. डी. मिळवली.

# कारकीर्द

नागनाथ कोतापल्ले हे इ.स. १९७७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००४ पासून २००९ पर्यंत कोतापल्ले मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बालपुरस्कार समिती आणि एसएससी बोर्डाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष असे कामही त्यांनी केले आहे. याउपर, नागनाथ कोतापल्ले हे १९८८ ते ९५ या काळात मराठवाडा साहित्य परिषदेचे कार्यवाह,

१९९५ ते ९६मध्ये साहित्य महामंडळाचे कोषाध्यक्ष आणि साहित्य संस्कृती मंडळाच्या मराठी वाङ्मयकोशाचे समन्वय संपादक होते.

मुंबईतले युवक साहित्य संमेलन, श्रीगोंद्यात आठवे ग्रामीण साहित्य संमेलन आणि कराडजवळ उंडाळे येथील साहित्य संमेलन या संमेलनांची अध्यक्षपदे नागनाथ कोतापल्ले यांनी भूषविली आहेत. याशिवाय, ते २०१२मध्ये चिपळूण येथील ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचेही अध्यक्ष होते. [२] [४][२]

# कोतापल्लेंवरील लेखन साहित्य

- डॉ.नागनाथ कोतापल्ले : व्यक्ती आणि वाङ्मय (संपादन : डॉ. शैलेश त्रिभुवन)

# पुस्तके

## कविता संग्रह

- कृष्णमेघ
- मूड्स

## कादंबरी व कथासंग्रह

- कर्फ्यू आणि इतर कथा
- कवीची गोष्ट
- गांधारीचे डोळे
- देवाचे डोळे
- पराभव
- मध्यरात्र
- रक्त आणि पाऊस
- राजधानी
- संदर्भ
- सावित्रीचा निर्णय

## समीक्षण, वैचारिक

- अपार्थिवाचे गाणे
- आधुनिक मराठी कविता: एक दृष्टिक्षेप
- ग्रामीण साहित्य स्वरूप व शोध
- ज्योतिपर्व
- दहा समीक्षक
- नवकथाकार शंकर पाटील
- निवडक बी. रघुनाथ
- पाचोळा
- पापुद्रे

- साहित्याचा अन्वयार्थ
- साहित्याचा अवकाश (समीक्षा)
- स्त्री-पुरुष तुलना

# पुरस्कार

नागनाथ कोत्तापल्ले यांना मिळालेले पुरस्कार:

- पुणे मराठी ग्रंथालयाचा साहित्य सम्राट न. चिं. केळकर साहित्य पुरस्कार[५]
- महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळालेले ग्रंथ
    - मूड्स (१९७६)
    - संदर्भ (१९८४)
    - गांधारीचे डोळे (१९८५)
    - ग्रामीण साहित्य (१९८५)
    - उद्याच्या सुंदर दिवसासाठी (२००२)
- *ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध*साठी परिमल पुरस्कार (१९८५)
- *ज्योतिपर्व*साठी केशवराव विचारे पारितोषिक (२००२)
- दलुभाऊ जैन चॅरिटेबल ट्रस्ट प्रायोजित पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन सूर्योदय साहित्यरत्न पुरस्कार (२०१८)
- यशवंतराव चव्हाण साहित्य पुरस्कार (२००१)
- *राख आणि पाऊस*साठी बी. रघुनाथ पुरस्कार (१९९५)
- *राख आणि पाऊस*साठी महात्मा फुले पुरस्कार (१९९५)
- *साहित्य अवकाश*साठी शिरीष गांधी साहित्य पुरस्कार

# संदर्भ


1.

- भाषा सल्लागार समिती अध्यक्षपदी डॉ. कोत्तापल्ले
- • "नागनाथ कोत्तापल्ले संमेलनाध्यक्ष". महाराष्ट्र टाईम्स. २ नोव्हेंबर २०१२. ७ नोव्हेंबर २०१२ रोजी पाहिले.
- • "नागनाथ कोत्तापल्ले यांचा प्रवास". महाराष्ट्र टाईम्स. ३ नोव्हेंबर २०१२. ७ नोव्हेंबर २०१२ रोजी पाहिले.
- • "नागनाथ कोत्तापल्ले साहित्य संमेलनाचे अध्यक्ष". झी न्यूज मराठी. १ नोव्हेंबर २०१२. ७ नोव्हेंबर २०१२ रोजी पाहिले.
- "डॉ. नागनाथ कोत्तापल्ले". महाराष्ट्र टाइम्स. २९ ऑगस्ट २००९. ७ नोव्हेंबर २०१२ रोजी पाहिले.